खऱ्या विद्यार्थ्याला कधीच सुट्टी नसते,
सुट्टी हि त्याच्यासाठी काहीतरी नवीन
शिकण्याची संधी असते.




विद्या सर्वार्थ सिद्ध्यै

**Chitrakoot**
**INTERNATIONAL SCHOOL**
CBSE Affiliation No. 1130346

**MAIN BRANCH**
Darewadi-Narayandoh Road,
Ahmednagar
**+91 97655 58100**

**Chitrakoot**
**gURUKUL**

**SAVEDI BRANCH**
Opp. Rahul Sweets, Nr. Bhide
Hospital, Savedi, Ahmednagar
**+91 97655 48100**



Mrs. Puja Gurbax,
Principal

या उल्लेखनीय पुस्तकाचे उद्घाटन करताना अत्यंत आनंद आणि अभिमानाची भावना आहे. चित्रकूट इंटरनॅशनल स्कूलची प्राचार्या या नात्याने मला अशा साहित्यिक निर्मितीचा परिचय करून देण्याची संधी मिळत आहे. जो आमच्या आदरणीय विद्यार्थ्यांच्या बौद्धिक पराक्रमाचा आणि सर्जनशीलतेचा दाखला आहे.

अशा युगात जिथे माहिती आपल्या बोटांच्या टोकावर आहे आणि बदलाचा वेग अथक आहे, साहित्याची प्रेरणा, माहिती आणि परिवर्तन करण्याची शक्ती अतुलनीय आहे. आम्ही ज्या पुस्तकाची सुरुवात करणार आहोत ते आमच्या विद्यार्थ्यांच्या अथक प्रयत्नांचा आणि कल्पक मनाचा दाखला आहे, ज्यांनी त्यांच्या कविता आणि कथाकथनाची आवड प्रतिबिंबित करणारे काम तयार केले आहे.

हे पुस्तक म्हणजे केवळ कागदावरील शब्दांचा संग्रह नाही;तर आमच्या तरुण विद्वानांच्या मनातील हा प्रवास आहे, आमच्या विद्यार्थ्यांमध्ये बौद्धिक कुतूहल आणि टीकात्मक विचारांची संस्कृती वाढवण्याच्या आमच्या वचनबद्धतेचे सार त्यात समाविष्ट आहे. आमच्या समर्पित प्राध्यापकांच्या अतुलनीय पाठिंब्याने मार्गदर्शन केलेल्या आमच्या विद्यार्थ्यांचे समर्पण आणि उत्साह, आम्ही CIS मध्ये जी मूल्ये आणि तत्त्वे राखतो ते प्रतिबिंबित करणारे कार्य सुरु केले आहे.

मी प्रत्येक वाचकाला खुल्या मनाने आणि आश्चर्याच्या भावनेने या पुस्तकाच्या पानांचा शोध घेण्यास प्रोत्साहित करते. ते प्रेरणास्त्रोत म्हणून काम करू दे. प्रतिभावान लेखक, मार्गदर्शक शिक्षक आणि या साहित्यकृतीच्या यशस्वीतेसाठी ज्यांनी योगदान दिले त्या सर्वांचे अभिनंदन.

या पुस्तकाच्या यशासाठी मी माझे मन:पूर्वक अभिनंदन आणि शुभेच्छा देते. ते वाचकांच्या हृदयात आणि मनावर त्याचा मार्ग शोधू शकेल आणि साहित्यिक विश्वात छाप सोडेल.



Mrs. Revati Paga
Marathi Teacher

सर्व पालक बंधु भगिनी व विद्यार्थी.

आपल्या विद्यालयातील " फुलबाग " अंक आपल्या विद्यालयातील लहान बालचमूंनी लिहिलेल्या स्वरचित कविता व गोष्टीचे पुस्तक आपल्या हाती देतांना विशेष आनंद होत आहे. आपण सर्व या पुस्तकाचे स्वागत करून आपल्या मुलांना विशेष प्रोत्साहन द्याल ही अपेक्षा. विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास हाच शिक्षणाचा मुख्य उद्देश असतो. हाच उद्देश लक्षात घेऊन शाळेत अनेकविध उपक्रम राबवले गेले आहेत. शाळा इंग्रजी माध्यमाची असली तरी इंग्रजी भाषेबरोबरच हिंदी, संस्कृत आणि आपली मातृभाषा मराठीही तितक्याच बरोबरीने शिकवली जाते आणि जपली जाते. असे म्हणतात, मूल जगाच्या कोणत्याही कोपऱ्यात गेले तरी आपल्या आईला कधी विसरत नाही तसेच आपण काळाच्या ओघात इंग्रजी जरी खूप महत्वाची असली तरी आपल्या माय मराठीची पाठ सोडलेली नाही. शाळेत मूलं इंग्रजी जेवढ्या आवडीने शिकतात तेवढ्याच आवडीने मराठीही शिकतात. आणि त्यांना शिकवली जाते. मुलांना ती खूप आवडतेही. भाषा ही मानवी जीवनाचा अविभाज्य भाग आहे.आपल्या मनातील भावना ,विचार,अनुभव व्यक्त करण्यासाठी भाषा हे समर्थ माध्यम आहे. खरं सांगायचे तर भूतकाळात डोकावून बघायला, भविष्यकाळाची सुंदर सोनेरी स्वप्ने रंगवायला कोण शिकवत?तर ती आहेत पुस्तके. ही पुस्तकेच मरगळलेल्या मनाला दिलासा देतात, संकट काळात आधार देतात, बहुश्रुत बनवतात. निसर्गाशी, माणसांशी, चांगल्या ग्रंथाशी, एखादया छंदाशी एकरूप होण्यातच आनंद सामावलेला आहे. दुख, विवचनेपासून दूर राहण्यासाठी, आत्मसमाधानासाठी प्रत्येकाला सोबत हवी असते, तसे आपणही आपले मन कशात तरी गुंतवून ठेवावे. आपल्याला आवडणाऱ्या आणि दुसऱ्याला उपद्रव न देणाऱ्या छंदातच आनंदाचा सूर दडलेला असतो. तोच सूर मुलांना सापडावा त्यांचे भावविश्व उलगडण्याचा शब्दांच्या माध्यमातून त्यांनी केलेला छोटासा प्रयत्न आणि त्याची फलश्रुती म्हणजेच "फुलबाग" हे पुस्तक. कवी ' बी ' च्या शब्दात थोडा बदल करून सांगायचे झाले तर.. नव्या उमेदी, नवे जिव्हाळे नव्या मुलांचे, नवे भरोसे नवे कवन हे नव्या उमाळ्याचे हेच तर सार साऱ्या उठाठेवीचे.

कथा, काव्य हे माणसाला त्याच्या विचारांना नवी दिशा देत असतात, ते माणसाला कधीही एकटे राहू देत नाहीत. आपली मुलेही त्यांच्या जीवनात असाच एखादा कथा,काव्याचा छंद जोपासून पुढे एक चांगले कवी, लेखक म्हणून नावारूपाला येवोत हीच सदिच्छा. आमच्या मुलांनी त्यांच्या बागेत लावलेली ही कथा, काव्यांची " फुलबाग " तुम्हांला सर्वांना नक्की आवडेल व तुमच्या सदिच्छांनी ती उत्तरोत्तर अशीच बहरेल हीच आशा.

धन्यवाद..

## सुख

सुख आहे तर नाही कसले दु:ख
सदा हसरे आहे ते मुख
आणि पीडा ची ती रुख

सुख आहे जीवनात जर ते
मन माझे सर - सर ते
काम मी आपुलकीने करते

हा माझा जीवनाचा जयघोष
आणतो मला आणखी जोष
नाही राहत कसलही रोष

अशी ही आहे तृप्ती,
देते दु:खाला मुक्ती
होते मनाला सुक्ती

सुख म्हणजेच आनंद, समाधान
उंच ती मान यशाची ती शान.



- नक्षत्रा कर्डिले
इयत्ता - 8 वी

## देवाची साथ

जर आहे देवाची साथ
तर करू सगळ्यान वर मात
नाही लागत कश्याची लाथ

जर आहे त्याची माया
आणि हाथाची छाया
नाही पडते कोणतीही वाईट छाया

आहे त्याचे असे भजन
भरून येते माझे नयन
सांगा आता कसे सांभाळू मी मन...

दिसली मला त्याची सावली
माहित नाही मी कशी धावली
आहे ती माझी गुरुमाऊली



-नक्षत्रा कर्डीले
इयत्ता - 8वी

## कोकीळ

कुहू कुहू  करत  रोज 'बसती झाडात ती

अशी उडते तशी फिरतें
कुहु कुहु कुहु करते रोज

आहे तिचा  स्वर निराळा
आहे तीचा कंठ गोड

ताल तिचा  अती मधुर
एकवूनी करते सर्वांना धुंद

करत राहते दुसऱ्यांना खूष
कुहू कुहू करते कोकीळ रोज



-सुहानी पवार
इयत्ता 8वी



## राधा कृष्ण

जर कृष्ण दिवा
तर राधा वाति
आहे त्यांची अशी प्रिति

जर फुल आहे कृष्ण
तर राधा आहे माळा,
लागला आहे सगळ्यांना
त्यांचा लळा


जर कृष्ण आहे बासुरी
तर राधा आहे धून
नाही राहिली कोणाला
कसलीच कुन-कुन

नामाचा आहे माझा
रोजचा व्यायाम ,
तोंडात माझ्या नुसते आहेत
'राधे' आणि 'श्याम'



-नक्षत्रा कर्डीले
इयत्ता - 8वी

## कृष्ण



कृष्ण तु माझा कृष्ण
नाही आहे तुझ्या पासून रुसन

किती आहेस रे बाबा गोड तू
कसं सांगू मी आता सोड तू

कशी ही तुझी माया
राहवेना माझा आता तुझ्या
विना साया

टाकल  तु आता मोहून मला
आहे कशी ही तुझी कला

नाही म्हणत मी काय
पाहिजे तुच मला कशी मी सांगू



- नक्षत्रा  कर्डिले
इयत्ता - 8 वी

## फुटबॉल

सुट्टी मध्ये मी जातो फिरायला मॉल,
आणि नंतर मी जातो खेळायला फुटबॉल.

फुटबॉल चे बुटे घ्यायला मी गेलो,
कारण मला आवडतो रोनाल्डो रोनाल्डो.

या खेळा मध्ये असतात पोल,
ज्याच्या आतमध्ये बॉल गेल्यावर होतो गोल.

वय महत्वाचे नसते, हे खेळाने केले सिद्ध,
म्हणून हा खेळ आहे सर्वात प्रसिद्ध.





-आदर्श बेरड
इयत्ता 8 वी

## मित्र

उन्हाळा आला की आपण खातो संत्र
पण सगळ्यांना असतो एक तरी मित्र.

आपल्या आयुष्यात घडला कोणता ही प्रसंग
तर आपला मित्र उभा असतो आपल्या संग

लहानपणी आपण धरतो एकमेकांचा हात
मोठे झालो आपण तरी नाही सोडत ते आपली साथ

जगात मित्राचे होऊ शकत नाही मोल
कारण मित्र असतात खूप अनमोल



-आदर्श बेरड
इयत्ता - 8 वी

## पाऊस

पाऊस आला झर झर झर
पाणी वाहते सर सर सर

वारा वाहतो भर भर भर
गारा पडतात टप टप टप

वीज चमकते चुक चुक चुक
दिवा करतो लुक - लुक लुक

जोरात येतो रिमझिम वारा
खूप चांगल्या दिसतात गारा



-सुमित पवार
इयत्ता 8 वी

## भाऊ

भाऊ भाऊ, भाऊ
किती तो डोकं खाऊ

बाप आहे तो माझा
किती डोकं खाई

मोठा तो माझा दादा
करतो सगळ्यासाठी वादा

हे कर  ते कर लागतो माझ्या पाठी
खेळण्यासाठी घेऊन जातो चौपाटी



-तमन्ना ठाकुर
इयत्ता 8 वी

## आई


आई तीच आहे म्हणतात तिला सगळे बाई
आई ती सगळ्यांची माई

काळजी तिला सगळ्यांची
परके आणि आपल्यांची

आहे ती आपली आई
तीच तर आपली माई

आपण तिची छाया
ती करते खूप माया

अपार आहे त्यांची माया
हयाच तर आपल्या आया





-नक्षत्रा कर्डीले
इयत्ता - 8वी

## पाऊस

बास झाले आंबे खाऊन
खूप दिवस झाले पाऊस पाहून

चालू झाल्या सगळ्यांच्या शाळा,
घेऊ लागला वारा हिंदोळा


उन्हाळ्यात असते सगळीकडे उबदार
पण पावसाळ्यात होते सगळे हिरवेगार

उन्हाळ्यात आंबे खाताना येते मला मजा
पण पावसाळा आहे
सगळ्या ऋतुंचा राजा




-आदर्श बेरड
इयत्ता -8 वी


## एक गोष्ट (कविता)



एक होता राजा,
तो वाजवायचा बाजा.

तो गेला रानात,
लपला एका कोपऱ्यात.

आला एक वाघ,
नव्हती बंदूक,
म्हंटला कोणाला माग

आणला करून शिकार
गेला पळून, झाला बेजार

तो गेला गावात,
वाटत होते, गेला शहरत.

गावात होता पोस्ट,
संपली आमची गोष्ट.




-आदर्श बेरड
इयत्ता - 8 वी

## वर्ग

वर्ग माझा खूप छान
पण नाही त्याला काही भान

नुसते बोलणे खात
आम्ही आहेत सात

करतो काम पट-पट
शिक्षा खातो झटपट

आठ घंट्याची शाळा
मोजत असतो घरी
जाण्याच्या वेळा

कधी शाळा सुटेल
कधी हसू फुटेल



- नक्षत्रा कर्डिले
इयत्ता - 8 वी

## झाड

झाड, झाड, झाड,
किती सुंदर हे झाड
हिरवे-हिरवे, इवले - इवले
छोटे से पान.



रोज रोज पाणी दया
ऑक्सिजन तुम्ही घ्या

फुल फुलतील छान-छान
हसत राहील पानन पान

झाड आहे हिरवे गार
वारा देते थंडगार

झाडाच्या सावलीत बसते मी
ऊनापासून वाचते मी.

झाडे जगवा झाडे जगवा
वाचवा पर्यावरणाचे भान ठेवा.



-पायल राऊत
इयत्ता - 7 वी

## शिक्षक



शिक्षक  असतात मोठे,
आपण  सगळे छोटे

शिक्षकांचा असतो मान,
ते सगळ्यानां देतात
ज्ञान समान.

शिक्षक असतात वेगळे,
पण त्यांचे शिष्य सगळे

शिक्षक करतात  सगळ्यांवर  प्रेम,
आपण त्यांच्या फोटो ची बनवतो फ्रेम....

शिक्षक आपल्यावर रागवतात,
आपल्याला नीट शिकवतात.

शिक्षक असतात देवा समान,
त्यांना सगळे देतात मान.



-श्रद्धा महैश गौड
इयत्ता - 7 वी

## या रे, सारे या रे...

या रे सारे या रे
गप्पागोष्टी करूया

खोड्या आपण काढूया
पकडा पकडी खेळूया
जोरात उड्या मारूया

खेळत खेळत गाणे गाऊ
हसत हसत अभ्यास करु


पळत घरी जाऊया
आईच्या कुशीत झोपूया



-पायल राऊत
इयत्ता - 7 वी

# शाळा

जेव्हा आम्ही करतो अभ्यास तेव्हा
आमचा एकच ध्यास.



पाटी -पेन्सील घेऊन जातो
शाळेत आम्ही अभ्यास करतो.

भूक लागताच डब्बा  उघडतो
सगळे आम्ही सोबत जेवतो.

शाळा म्हणजे किती छान
शिक्षक आहेत सर्व महान.

वर्गामध्ये असतात गुरु
शिकवायला करतात सुरु

शिकून आम्ही मोठे होतो.
नोकरी साठी तयार होतो.

शाळे मध्ये जाऊया
शिकून मोठे होऊया.

शाळे मध्ये जाऊया
शिकून मोठे होऊया.



-पायल राऊत
इयत्ता - 7वी

# संक्रात

तिळगुळ घ्या गोड़-गोड़ बोला
संक्रात आली पतंग उडवू चला



पौष महिन्यात संक्रात आली
पंतग उडवू आमच्या दारी

अंगण स्वच्छ करूया
दारात रांगोळी काढूया

मोठ्यांना नमस्कार करूया
गोड-गोड तिळगुळ खाऊया

पुरणपोळी खाऊ आपण
पतंग उडवायला जाऊ आपण

तिळगुळ घेऊन मंदिरात जाऊ
हळदी- कुंकु सगळ्यांना लावू

संक्रात आली संक्रात आली
तिळगुळ खायची वेळ झाली



-पायल राऊत
इयत्ता - 7 वी

# दिवाळी

फट फटाका फुटला
धम धमाका झाला

लावा दिवा रांगोळी वरी
सण आला घरी
आई सर्व फराळ करी
गुळसाखर हसली

करंजीत बसली
कुरकुरीत चकली
पोटभर खाल्ली

चंदनाचे ताट
सोन्याचे पाट

आली, आली दिवाळी
बहीण भावाला ओवाळी

घेतला चिवडा ताटली भर
सर्वांना दिला मुठभर

शेव केली आईने
खाल्ली ती ताईने

आली ही दिवाळी घरी
रांगोळी काढा दारी





-पायल राऊत
इयत्ता - 7वी

# भाऊ

माझ्या कडे माहेत भाऊ दोन,
घरी गेल्यावर दररोज बघतात फोन.

दोघ करतात खोडी,
भांडी दररोज फोडी.

जेव्हा मिळतो त्यांना मार
मला मज्या येते फार

आमच्या तिघात मी मोठी,
ती दोघ माझ्या पेक्षा छोटी.

जेव्हा आम्ही तिघे भांडतो,
सगळ सामान इकडे तिकडे पाडतो

पण मी आहे भाग्यवान
मला मिळाले भाऊ गुणवान.



-श्रध्दा मडैश गौड.
इयत्ता - 7वी

## आई

आई माझे जीवन,
तिला करते नमन.

आई ची जागा सगळ्यात मोठी,
मी तीला कधी नाही म्हणत खोटी.

आईने दिला मला जन्म ,
तीच खर आहे मोठ मन

आज मी गाते गानं,
तिचा करते मी मान.

आई माझं सर्वस्व ,
तिने आणले मला नवीन वस्त्र.

आई च प्रेम जगात मोठ.
ज्याला म्हणत नाही कधीच खोटं



-श्रध्दा महैश गौड.
इयत्ता - 7 वी

## गुलाब आणि झेंडू



गुलाबाचे फुल किती छान,
त्याच्या खाली हिरवे पान,

गुलाबचे रंग लाल, नारंगी पिवळा,
त्याच्या आपण बनवतो माळा

गुलाबाचे फुल लावतो, केसात,
आनंद होतो मनात
झेडचे फुल आपण वाहतो देवाला,
सदा वापरतो सेवेला

झेंड़ चे फुल छान
त्याचा असतो सणाला मान



-श्रध्दा महैश गौड,
इयत्ता - 7 वी

## पुस्तक

पुस्तक देते आपल्याला ज्ञान
बनवतो आपल्याला महान

पुस्तकाचे आहेत खूप प्रकार,
त्यामुळेच होतात स्वप्न साकार

पुस्तक सांगतो शिक्षण मोठ,
आपल्याला करतो जगात मोठ

पुस्तक म्हणजे सरस्वती देवी
तीच आपल्याला सुखरूप ठेवी

पुस्तक आहे सर्वत्र,
त्याचेच आहे मोठे अस्त्र

पुस्तक आहे जगात मोठे
त्याच्या समोर सगळ छोट !

पुस्तक देतात ज्ञान, ज्ञान
जगात त्याचा आहे मान , मान



-श्रध्दा महैश गौड.
इयत्ता - 7 वी

## बाबा

बाबा आहेत छान-छान
वेळेवर करतात काम

बाबा करतात खूप मेहनत
त्यांच्यात आहे खूप हिम्मत

पण आहेत काही वाईट सवयी पण
काही हरकत नाही !!

मी आहे खूप निष्काळजी पण माझी
करतात खूप काळजी

करतात पूर्ण माझे सर्व हट्ट
चेष्टेने म्हणतात मला मठ्ठ



-राधिका उगले
इयत्ता - 7वी

## दिवाळी

दिवाळी आली दिवाळी आली
फटाके फोडण्याची वेळ आली

चला काढूया रांगोळी
घराला सजवूण दिव्यांणी

मोठ्यांचा आशीर्वाद घेऊणी
घेऊनी नवे कपडे घालूनी

भाऊबीज आली भाऊबीज आली
भावाला ओवाळायची वेळ आली
दिवाळी आवडती मला खूप
मी वाजवले फटाके खूप



-अनुष्का अमृते
इयत्ता 6वी

## खेळणी

खेळणी वाला आला
खेळणी वाला आला

खेळणी वाल्याने
खेळणी आणली.
फुगे घेऊन आला

बासरी घेऊन आला
सुंदर गीत वाजवत आला

गीताने मोहिले माझे मन
नाचायला लागले मी छन छन छन

डोरेमोन आणला, शिनचान आणला
खेळणी गल्याने डमरू आणला

डमरू वाजतो डम - डम - डम
खुळखुळा वाजतो छम छम छम

खेळणी आवडतात मला खूप
आईने घेतली खेळणी खूप



-अनुष्का अमृते
इयत्ता 6वी

## बासूरीवाला

बासुरीवाला आला हो बासुरी वाला आला.

अरे मुलांनो  बासुरी घ्याल काय?
आणि  वाजवणार  काय?

लहान मोठी, छोटी बासुरी घेणार काय?
रिंकू, चिंकू, राधा, सीता म्हणाले
कितीला  देणार  सांगाला काय?

बासरी घेतली सगळ्यांनी छान
सुराने हरपले सगळ्यांचे भान

बासुरीवाला गेला
हो बासुरी वाला गेला



-अर्णव  कर्डिले
इयत्ता - 6वी

## वडील

वडील हे मायेचा सागर
आम्ही मुले करतो आदर

काम करून जीवनाचे करतात रान
आम्ही  करतो अभ्यास छान-छान

वडील घराची करतात रक्षा
त्यांना आमच्याकडन खूप अपेक्षा

खूप आमच्या साठी आणतात  मेवा
ते करतात परिवाची सेवा

वडिलांशिवाय परिवाराचे  जीवन आहे अपूर्ण
आम्ही करतो त्यांचे स्वप्न पूर्ण

त्यांची मेहनत खूपच अमाप
आयुष्यात होऊ शकत नाही त्यांचे मोजमाप.



-हर्षल साठे
इयत्ता - 5 वी

# आई

कधी चिडचिड करते
कधी प्रेमाने बोलते.

कधी चिडचिड करते
कधी प्रेमाने बोलते.

सतत बोलत असते
झोपताना सुद्धा टेन्शन घेते
इतक बोलते तोंड गप्प करून टाकते

मला आता कळले की,
आई अशीच असते.
कधी प्रेमाने बोलते तर
कधी चिडचिड करते.

मला आता कळले की
आई अशीच असते .





-शताक्षी भगत.
इय्यता : 5वी

# झाड



झाड लावले दारावर
फुल आले झाडावर,

फुलपाखरे आली झाडावर
आम्ही गेलो छतावर

छतावरून दिसले फळ
आले झाडावर
आम्ही गेलो दारावर

आम्ही चढलो झाडावर
फळ खाल्ले आम्ही
पाणी दिले झाडाला आम्ही



-स्वरा वाळके
इयत्ता - 5 वी

## पाऊस

पाऊस आला,
पाऊस आला

थेंब टपोरा नाचू लागला

गवतावरती पडला थेंब
अंग झाले ओले चिंब

अंग शहारले वाऱ्यावरती
मन डोले थेंबावरती



-वैष्णवी साठे
इयत्ता - 5 वी



## झाड

एक होत झाड,
ते होत छान
झाड आपल्याला सावली देतात झाड -
आपल्याला प्रेमही देतात
झाडावर असतात पानच पान झाड
असते छान छान



-आराध्या भांडवलकर
इयत्ता - 4थी

## पाऊस

आला आला  पाऊस आला

पाऊस आला सर सर सर

बडूक बोले डराव डराव

मोर नाचातो छूम घूम घूम

झाडे भिजले पक्षी भिजले

ओली माती सजली

हिरवाई अंगणी आली

आता आला पाऊस आला



-यश सिंग
इयत्ता - 4थी

## कावळा

कावळे मामा
कावळे मामा

तुम्ही कशाला काव काव करता

तुमचा रंग काळा असता

उंच आकाशी उडत असता

इतर वेळी नको असता

पण पितृपक्षी हवे असता .



-आलिया खाटिक
इयत्ता - 4थी

## पाऊस

पाऊस पडतो छम छम छम
वादळ यतो गड गड गड
पाऊस येता नदी भरतात भर भर भर
पाऊस येता बेडूक करतात डराव डराव
पाऊस येता मोर नाचतात थुई थुई थुई



-पृथ्वीराज जाधव
इयत्ता - 4थी

## पाऊस

पाऊस आला ,पाऊस आला
मजा झाली खूप

पाऊस आला ,पाऊस आला हिरवळ झाली खूप

पाणीच पाणी झाले
बेडकांचे डराव डराव वाढले

पावसात भिजून नाचूया
खेळून चिंब होऊया.

नाव  बनवून घेऊ मजा
पाण्यात सोडून खेळू चला



-श्रुती
इयत्ता - 4थी

## झाड

एक होत झाड, ते होत छान
झाड आपल्याला सावली देतात
झाड आपल्याला प्रेमही देतात
झाडावर असतात पानच
पान झाड असते छान छान



-आराध्या भांडवलकर
इयत्ता - 4थी

## चिमणी

चिमणी राणी
चिमणी राणी

ये माझ्या दारी ,
खाऊनी चारा
पिऊनी पाणी
जा आपल्या घरा

ये माझ्या अंगणी
एकवितो मी तुला कहाणी



-आयुष कांडपाल
इयत्ता 3 री

## रंगपंचमी



चला चला रंगपंचमी आली
रंग खेळायची वेळ झाली.

लाल ,पिवळा, हिरवा ,निळा
चला चला रंग खेळायला

मुलांनी आणली पिचकारी
खेळ रंगपंचमीचा  झाला भारी



-वैष्णवी ससे
इयत्ता - 3री





## विचार

विचारा पासुन घडते सुविचार
विचार बदलतात  आचार

जो करतो चांगला विचार तो
नसतो कधी लाचार

दिवस भरात मला येतात  खूप  विचार
मी करते सगळ्यांना विचार

मला प्रश्न पडला?
 विचार  कधी घडला?



-राधिका उगले
इयत्ता - 7वी

## रक्षाबंधन

आला सण रक्षाबंधनाचा ...
भाऊ आला दारी माझ्या

ओवळीले भाऊरायाला
माझ्या राखी बांधते हाताला त्याच्या

सजली मिठाई ताटात
भाऊ माझा लाखात



-वैष्णव मगर
इयत्ता - 3री

## रंगपंचमी

होळी आली, होळी आली

रंगीबेरंगी रंग आणले,

प्रत्येकाच्या चेहऱ्यावर रंग फेकले

सर्वांचे चेहरे रंगीबेरंगी केले,
होळी आली, होळी आली



-अंकुश राज
इयत्ता - 3री

## पाऊस

पाऊस आला ,पाऊस आला
सगळ्यांना भिजवून गेला

पाऊस आला ,पाऊस आला
नदी नाले भरून गेला.

पाऊस आला ,पाऊस आला
घरे मंदिरे भिजवून गेला.

पाऊस आला, पाऊस आला
सगळीकडे चिखल झाला.

पाऊस आला ,पाऊस आला
मला खूप आनंद झाला.



-वैष्णव मगर.
इयत्ता - 3 री

## माझा देश

माझा देश भारत
तो कधी नाही हारत

तो माझा भारत महान
सगळे राखतात त्याचा मान

भारतचा झंडा तिरंगा
आमची पूज्य नदी गंगा

भारतात आहे विविध धर्म
त्यांना समान मानतात सर्व

भारतात धान्य उगवतात शेतकरी
सगळे आहेत कष्टकरी

भारताची माता भारत माता
सर्व तिचा मान राखता

भारत देश सगळ्यात मोठा
जो कधी नाही होणार छोटा



-श्रध्दा महेश गौड
इयत्ता - 7वी

## राम

राम आले, राम आले
सगळ्यांनी त्यांचे स्वागत केले.

सगळ्यांनी  लावले घरात दिवे सगळ्यांनी
घातले कपडे नवे

22 जानेवारी सगळ्यांना आहे लक्षात
त्या दिवशी सगळे अयोध्येच्या कक्षात.

सीतेची मूर्ती आहे प्रसन्न
पाहून होतील पूर्ण स्वप्न

रामाचे मंदिर छान
पाहुन सगळ्यांचे हरवतील भान

राम सीता ची जोडी भारी
मान करती दुनीया सारी .



-श्रध्दा महेश गौड
इयत्ता : 7 वी

## स्पर्धा

एके दिवशी एका पार्क मध्ये काही मुलं खेळत होती. ते वेग-वेगळे खेळ खेळत होते. त्यांनी नेट वर चढायचा खेळ खेळायचं ठरवलं. सगळे जन एक-एक करून नेट वर चढले. त्यांच्या मधे एक मुलगा होता जो शरीराने जाड होता. त्याचं नाव राहुल होतं. तो नेट वरती चढायला लागला तेवढ्यात तिथे काही मुलं आली. ते मुलं त्याला चिडवायला लागले. ते ल्याला म्हणाले कि तो त्या नेट वर नाही चढू शकणार. त्याच्या मित्रांनी त्या मुलांना त्याला चिडवण्या पासुन थांबवायचा प्रयत्न केला. पण तरी ही ते त्याला चिडवत राहीले. नंतर त्यांनी एक स्पर्धा करायचं ठरवलं. स्पर्धे मध्ये जो आधी त्या नेट वर चढून उतरेल तो जिंकेल, असं त्यांनी ठरवलं आणि जो हरेल तो उठाबशा मारुन समोरच्याची माफी माघेल. त्यांनी दोन टीम बनवल्या. प्रत्येक टीम बारी-बारी नेट वरती चढेल. जी टीम सगळ्यात कमी वेळात पूर्ण करेल ती टीम जिंकेल. आधी त्या चिड़वणार्या मुलांची टीम नेट वरती चढली. त्यांनी चार मिनिटांत ते पूर्ण केलं. त्या नंतर राहुल ची टीम चढली. त्या सगळ्यांमध्ये राहुल सर्वात आधी ती नेट चढून खाली आला. त्याला चिडवनारे मुलं त्याला बघुन गप्प झाले. नंतर सगळे खाली आले. त्यांनी नेट चढून उतरायला चार मिनिटांपेक्षा ही कमी वेळ घेतला. ते ती स्पधी जिंकले आणि त्या चिडूवनार्या मुलांची टीम हरली. ठरल्या प्रमाने त्यांना उठाबश्या माराव्या लागल्या आणि राहुल ची माफी ही मागावी लागली.





-सुमित पवार

इयत्ता - 8वी

## आयुचा प्रामाणिकपणा

एका गावात आयु नावाचा एक मुलगा राहत होता. एके दिवशी तो त्याच्या आई कडे गेला आणि म्हणाला की आई- माझे पेपर संपले.मी 15 दिवस झाले मी चॉकलेट नाही खाल्ले. आई म्हणली की हो. तो म्हणाला की मी 15 दिवस किती अभ्यास केला. आई हो म्हणाली. आई म्हणाली ठीक आहे पण घरात आता चॉकलेट ठेवलेली नाही तो म्हणाला की आई तु मला पैसे दे मी आणतो. आई म्हणाली बर ठीक आहे. पण जपून जा . आयु हो म्हणला. आई ने त्याला पैसे दिले. तो दुकानात पोहचला. त्यानी विचार केला की मी काय घेऊ?. त्याने लॉली - पोप घेतले. दुकाना दार म्हणला थांब त्याचे स्टिकर घेऊन जा. आयु घरी पोचला. तो त्याच्या मोठया बहिणीकडे गेला . तीचे नाव पीहू आहे. ती म्हणाली की मला पण लॉली- पोप देना. तो आधी नाही म्हणला पण नंतर त्याच्या लक्षात आले की आईने काही आणले तरी ते सगळ्यांना देऊन खायचे त्याने तिला लगेच लॉली पॉप दिले व त्याच्या आई बाबांनाही दिले.नंतर त्याने दुकानदाराने त्याला दिलेले स्टिकर काढले तर त्याच्या लक्षात आले की आपल्याला दोन स्टिकर जास्त आले आहेत.त्याला आधी वाटले की राहू द्यावे पण त्याच्या लक्षात आले की आईने सांगितले की कोणाकडूनही काही फुकट मिळाले तर ते घेऊ नये त्यांना ते परत करावे.त्याने स्टिकर काढले 1 त्याच्या बहीनीला दिले आणि 1 त्याच्या डब्याला चिटकवल.आणि त्याला जे जास्तीचे स्टिकर आले होते ते त्याने दुकानदाराला परत दिले.



-आर्या

इयत्ता 6वी

## कर्म तैसे फळ

एका जंगलात एक घमंडी हत्ती राहायचा. त्या जंगलात बाकीचे सर्व प्राणी पण रहायचे तिथे .हत्ती सगळ्या प्राण्यांची घरे तोडायचा. एकदा त्याने तिथे राहणाऱ्या चिमणीचे घरटे तोडले.चिमणीला खूप वाईट वाटले.हत्ती चिमणीचे घरटे तोडताना दुसरी चिमणी सावध झाली.काय करावे हे कोणालाही कळेना. तो नेहमी असेच कोणाची ना कोणाची घरे तोडायचा. एकदा त्या जंगलात सगळ्या प्राण्यांची सभा झाली त्यामध्ये दूसरी चिमणी जी होती ती म्हणाली मित्रांनो आपण त्या हत्तीला धडा शिकवायला हवा.एक महिन्यानंतर हत्तीने पुन्हा त्या दुसऱ्या चिमणीचे घरटे तोडले आणि चिमणीचे अंडे फोडले. मग मात्र चिमणीला खूपच राग आला .आता तिने एक योजना बनवली ती मुंगी मावशी कडे गेली. आणि म्हणाली तुम्ही माझी मदत कराताल काय?. मुंगी म्हणाली हो करेल की , त्यांनी विचार केला की,काय करता येईल विचार केल्या नंतर असे ठरले की हत्ती जेव्हा झोपेल तेव्हा त्याच्या सोंडे मध्ये मुंगीने जायचे आणि त्याच्या सोंडेला चावायचे मग हत्ती जेव्हा झोपला होता. तेव्हा मुंगी मावशी हत्तीला चावली. हत्ती रागाने चवताळले काय होत आहे त्याला आधी काही कळेना त्याला खूप त्रास होत होता. तो इकडून तिकडे पळू लागला.थोड्या वेळा नंतर तो शांत झाला.काय झाले त्याला समजेना तो विचारात पडला .तिच्या लक्षात आले की हे कोणी तरी मुद्दम केले आहे तेव्हड्यात त्याला चिमणी दिसली आणि मुंगी दिसली त्याला खत्री पटली की हे ह्यांनीच केले असणार तो त्यांच्या मागे पळाला दोघीही त्याला काही हाती लागल्या नाही नंतर त्याचेच त्याला समजले की जर आपण कोणाला त्रास दिला तर दुसरेही आपल्याला त्रास देतात तेव्हा पासून त्याने ठरवले की आपण कोणालाही त्रास द्यायचा नाही.



-अर्णव कर्डिले
इयत्ता - 6वी

## मैत्री

दोन खूप चांगले मित्र होते मोहन आणि रोहन.ते 7वी त शिकत होते. त्यांच्या परीक्षा जवळ आल्या होत्या. मोहन ने विचारले कशी चालू आहे तयारी? रोहन म्हणाला बरी चालली आहे. पण मला ना नीट तयारीच करता येत नाहीए, नुसता आजू-बाजूला लक्ष जातं. मग मोहन म्हणाला अरे आपल्याला अभ्यास शांतपणे करायला हवा. रोहन म्हणाला कसा अभ्यास करू मी ज्या ठिकाणी राहतो त्या ठिकाणी तर खूप गजबज आहे. कारण मी झोपडपट्टीत राहतो बऱ्याचदा लाईट पण नसते. काय करू मला तर शिकून खूप मोठे व्हायचे आहे .यावर मोहनने एक उपाय काढला की,तू रोज माझ्या घरी येऊन अभ्यास कर आपण दोघे मिळून अभ्यास करू म्हणजे चंगला अभ्यास होईल.ठरल्याप्रमाणे रोहन शाळा सुटल्यावर मोहनच्या घरी जाऊन अभ्यास करू लागला.त्यामुळे रोहनला खूप मदत झाली.पुढे तो शिकून खूप मोठा अधिकारी झाला व त्याने मोहनचे उपकार कधीही विसरले नाही त्यांची मैत्री पक्की राहिली .



-पायल राऊत
इयत्ता - 7 वी

## वृक्षाचे महत्त्व

एक मोठे झाड होते. जेव्हा कोणी त्याला झाडाखाली बसायचे तेव्हा झाड वाऱ्याने थरथरू लागे. एके दिवशी एक मुलगी झाडाखाली बसून विचार करत होती की,आज माझ्या माईचा वाढदिवस तिला मी काय देऊ? मग ती झाडाखाली बसून डोळे मिटून विचार करता करता झोपी जाते तिला जाग आली तेव्हा ती वेळ पाहते दुपारचे बारा वाजले होते. मग ती म्हणते, नाही मला उशीर होतोय, मग वाऱ्याने झाड थरथरू लागतं. मग झाड म्हणू लागतं का उदास आहेस, तुला काय हवंय? मग मुलगी विचार करू लागते, हे झाड कसं बोलतं? तेव्हा ती मुलगी म्हणते, अरे तू कसा बोलायला लागलास, झाड तर बोलत नाही.मग झाड बोलते की, झाडे बोलण्याचा प्रयत्न का करू शकत नाहीत?. तेव्हा मुलगी म्हणते, मी काय करू, माझ्या आईचा वाढदिवस आहे आणि मला माझ्या आईला एक छान भेट द्यायची आहे. मग वाऱ्याने झाड थरथरू लागते आणि बरीच फळे गळून पडतात मग मुलगी हळू हळू सर्व फळे उचलते मग मुलगी म्हणते अरे पण मी हे कशात ठेवू माझ्याकडे ठेवायला काहीच नाही, झाड आपल्या झुडुपातून घरटे आणते.अगदी छान पानांनी विणलेले .मग ती मुलगी म्हणते "अरे तू पक्ष्याचे घरटे दिलेस का ?मग झाड म्हणाले " काळजी करू नकोस पक्षी आधीच उडून गेले होते इथून. मुलीने विचारले, माझ्या आईला हे आवडेल का? तेव्हा झाड म्हणते, तुझ्या आईला हे खूप आवडेल. मग ती घरी जाऊन आईला फळांनी भरलेली टोपली देते. तिची आई म्हणाते तुला कसं कळलं मला फळ खूप आवडतात. आई म्हणते त्याच बरोबर कोणताही पैसा खर्च न करता तू हे मला जे गिफ्ट दिलं ते मला खूप आवडलं मग दोघेही फळे खातात, मुलगी बाहेर झाडा जवळ जाते आणि झाडाचे आभार मानते आणि सर्वजण आनंदाने नाचू लागतात.



-अर्पिता दास
इयत्ता - 6वी

## जंगलातील वाघ

एके दिवशी एक वाघ जंगलात आला. सगळे प्राणी घाबरून इकडे-तिकडे पळायला लागले.

वाघाने गर्जना केली. वाघ एका हरणाच्या मागे पळायला लागला आणि हरणाला त्याने पकडले व त्याला घेऊन गुहेत निघाला तेवढ्यात त्या हरणाचे छोटे-

पिलू त्याच्यासमोर उभे राहिले. आणि आपल्या आई पकडलेले पाहून पिल्लाचे डोळे भरून आले. आणि आपल्या पिल्लाला पाहून त्या हरणाचेही डोळे भरून आले. दोघेही रडू लागले. ते पाहून वाघाला खूप वाईट वाटले. हरणाचे व पाडसाचे प्रेम पाहून त्या वाघाच्या मनातील माणुसकी जागी झाली त्या वाघाला त्यांच्यावर खूप दया आली. वाघाने हरणाला सोडून दिले व तो आपल्या गुहेत जाऊन बसला. हे पाहून पाडसाला खूप आनंद

झाला व त्याने जाऊन आपल्या आईला मिठी मारली दोघेही

खूप खुश झाले आणि आपल्या घरी सुखरूप पोहचले.पण हरणाला आश्चर्य वाटले की वाघाने मला कसे सोडले पण नंतर त्याच्या लक्षात आले की आई व बाळाचे प्रेम पाहून कोणीही व्याकूळ होते म्हणून कदाचित हेच प्रेम पाहून मला सोडले असावे त्याला खूप आनंद झाला. व आपल्या पिल्लाला घेऊन ते आपल्या ठिकाणी परत गेले.



-हर्षल साठे
इयत्ता - 5 वी

## फुगेवाला

एक माणूस होता. तो फुगे विकत होता. सर्वजण त्याला फुगेवाला म्हणून हाक मारत होते. तो फुगेवाला रस्त्याने गावोगावी जाऊन फुगे विकून पैसा कमवायचा आणि आपले कुटुंब चालवायचा. फुगेवाला रोज रंगबिरंगी फुगे घेऊन फिरत रोज असायचा. छोटी-छोटी मूले काका-काका म्हणून त्यांच्याकडे पळायची व फुगे विकत-घ्यायची तो दिवसभर रस्तावर उभा राहून फुगे विकायचा. गरीबी असल्यामुळे त्याला हे काम करावे लागत असे. एके दिवशी एक मुलगी फुगा घ्यायला येते परंतु तिच्याजवळ पैसे नसतात त्या माणसाला फुगा मागते. तो तिला फुगा देतो. त्याने फुगा दिल्यावर ती मुलगी खूप खुश होते. तिच्या चेहऱ्यावरचा आनंद पाहून फुगेवाला पण खुश होतो.एके दिवशी रस्त्याने फिरत असताना त्यादिवशी खूप ऊन होते .फुगेवल्याने काही खाल्ले नव्हते व त्याला रस्तावर चक्कर आली. व तो पडला त्याचे सर्व फुगे लोक घेऊन गेले.परंतू त्याला कोणीही हात लावल नाही.की काय झाले म्हणून त्याला पाहिले नाही. तेवढ्यात त्याने ज्या मुलीला फुगा दिलेला असतो ती जात असते.ती मुलगी त्याला फुगेवाल्याला पडलेले पाहते .लगेच पळत त्याच्याकडे जाते.त्याला पाणी पाजते तिच्या सोबत तिचे वडील असतात .दोघे मिळून त्याला उठवतात.खाऊ घालतात. त्यानंतर फुगेवला त्या मुलाला आशीर्वाद देतो त्याला लक्षात येते की आपण केलेले चांगले कर्म वाया गेले नाही.






-हर्षल साठे
इयत्ता - 5 वी

## जिवलग मित्र

एक गाव होते, तिथे दोन मित्र रहायचे. त्यांचे नाव होते सखाराम आणि समर . सखाराम गरीब स्वभावाचा होता. त्याला एक मुलगा होता. त्याचे नाव अर्जुन होते. एकदा सगळेजण दुसऱ्या गावातून काम करून येत होते. तेव्हा त्यांना एक साधु बेशुद्ध पडलेला दिसला .तेव्हा त्यांनी त्या साधूला मदत केली.त्याला उठवले पाणी पाजले. साधूला ब्रे वाटले ते म्हणाले की ,तुम्ही माझी खूप मदत केली .नाहीतर मी इथेच पडून राहिलो असतो .मला तुम्हाला काही तरी द्यायचे आहे पण माझ्याकडे तुम्हाला द्या काहीही नाही .सगळे म्हणाले की,आम्हाला काहीं नको.तुम्हाला बरे वाटले ना बस झाले.पण साधू काही ऐकेना तो म्हणाला माझ्याकडे धन दौलत नाही पण एक विशेष प्रकारची माती आहे.ती मी तुम्हाला देतो.त्या मातीने तुम्ही काहीही बनवले तरी ते तुटणार नाही.साधूच्या आग्रहामुळे त्यांनी ती माती घेतली.आणि घरी आले. समरने त्या माती पासून मडके बनवले.सखाराम त्याच्या मुलाला म्हणाला की आपण पण मडके बनवू. अर्जुन म्हणाला नको बाबा aapn मडके नको खेळणी बनवू .सखाराम म्हणाला अरे खेळणी जातील का? मडके म्हणजे सगळे घेतील पण अर्जुन म्हणाला हो जातील.मडके बनवले तर लोक एकदाच घेतील पण जर खेळणी वेगवेगळी बनवली तर लोक नेहमी घेतील.आणि तसेच झाले सखारामने बनवलेली खेळणी सर्वांना आवडू लागली .लोक ते जास्त खरेदी करू लागले.मात्र समरने बनवलेले मडके लोक नंतर विकले जात नव्हते. तेव्हा समरच्या लक्षात आले की,कोणतेही काम करण्यापूर्वी पुढचा विचार नीट करण्याची गरज आहे.तेव्हा त्याने ही अर्जुन आणि सखाराम बरोबर चर्चा करून त्या मडक्यावर वेगवेगळी चित्र काढली त्यामुळे त्याची मडकी ही लोक घेऊ लागले.





-अर्णव कर्डिले
इयत्ता - 6वी

## कोंबडी

एका गावत एक रवी नावाचा मुलगा होता.त्याच्याकडे एक कोंबडी होती. ती कोंबडी त्याला खूप अंडे द्यायची. तो त्या अंड्यांना विकून खूप पैसे कमवायचा. पण एके दिवशी कोंबडीने अंडे दयायचे बंद केले, तिची तब्येत खराब झाली. ती अंडे पण देत नव्हती त्याला वाटले की , कोंबडी त्याच्या कामाची नाही . त्यामुळे त्याने त्या कोंबडीला सोडून दिले व ती कोंबडी तशीच उपाशी फिरत राहिली. एक-दोन दिवस असेच गेले.त्यानंतर दोन लहान मुलांना ती कोंबडी सापडली. व ते त्या कोंबडीला घरी घेऊन गेले व त्यांनी कोंबडीची काळजी घेतली. व थोड्याच दिवसांनी कोंबडी खूप छान झाली. तिची तब्येत सुधारली.व आता ती कोंबडी परत अंडे देत होती. मुलांनी त्यांच्या आई-बाबांजा त्या कोंबडी बद्दल सांगितले. त्यांनी ते अंडे विकवून पैसे कमवले. एके दिवशी रवीने पाहिले के त्याची कोंबडी त्या मुलांकडे आहे. तो लागेच त्या मुलांन कडे गेला व म्हणाला "ती माझी कोंबडी आहे मला ती परत पाहिजे?" मुल म्हणले नाही व ते म्हणले या कोंबडीची काळजी आम्ही घेतली आहे, आता ही कोंबडी तुम्हाला नाही देणार?तरीही रवीने त्या कोंबडीला नेले पण दुसऱ्या दिवशी ती कोंबडी परत त्या मुलांकडे गेली.तेव्हा रवीच्या हे लक्षात आले की मी चूक केली.ती आजारी होती तेव्हा तिची काळजी घेणे आवश्यक होते.त्याची चूक त्याला लक्षात आली व त्याने त्या मुलांची माफी मागितली.





-अनुष्का अमृते
इयत्ता - 6 वी

## जंगल

एक जंगल होतो. तेथे खूप प्राणी होते.जसे ससा, कासव, हत्ती, बकरी आणि सिंह . त्यात हत्ती सगळ्यांना खूप त्रास दयायचा. एके दिवशी हत्ती सश्याला त्रास देत होता. ससा म्हणाला का रे दादा तुला काही काम-धाम नाही का? हत्ती म्हणाला माझ्या कडे एक काम आहे ना. ससा म्हणाला कोणते? हत्ती म्हणाला तुला त्रास द्यायचा आणि जोर-जोराने हसायला लागला.असच हत्ती रोज सगळ्या प्राण्यांना त्रास दयायचा. सगळे प्राणी खूप वैतागले होते. त्यांनी एका युक्तीचा विचार केला.

ते म्हणाले, आता हत्ती परत त्रास दयायला आला की आपण लपून जाऊ मग तो पुढे-पुढे आला की, त्याला नदीत ढकलून देऊ. तसेच झाले जशी त्यांनी युक्ती केली.सगळ्यांचे दिवस छान चालले होते पण अचानक दोन-तीन वर्षा नंतर जंगलात काही माणस प्राण्यांना पकडायला आले. प्राण्यांना बंदुकीचा आवाज आला. प्राणी पळायला लागले. माणसांनी प्राण्यांना पकडून सर्कस मध्ये नेले. सगळ्या प्राण्यांना खुप वाईट वाटल. कासव सगळया प्राण्यांना म्हणाला जरका आपण आज हत्ती ला नसते मारले तर आज त्यांनी त्या आपल्याला वाचवले असते.सर्वांना असे वाटले की,आपण हत्तीला न मारता त्याच्याशी बोलून मार्ग काढायला हवा होता.सगळ्यांना हत्तीला मारल्याचा पश्चाताप झाला.



-तनिष्का कसबे
इयत्ता - 6वी

## रियाची पेन्सिल

एक मुलगी होती. ती खूप सुंदर होती. तिचे नाव रीया होते. ती खूप हुशार होती. सगळ्या मुली तिला नेहमी त्रास देत. कारण ती कोणालाच काही म्हणत नसे.एके दिवशी या सगळया मुलींनी तिची एक सुंदर पेन्सिल लपवली. रीया खूप रडली. रीयाने त्यांची शिक्षकांना तक्रार केली. दुसऱ्या दिवशी त्यांचे शिक्षक आले आणि त्यांनी रियाच्या सगळया मैत्रीणीना त्यांनी रागवले. पण त्यांना काही फरक पडला नाही.ते सगळे तरीही रीयाला सगळे त्रास द्यायचे .रियाने विचार केला की,यांना शिक्षकांनी बोलूनही काहीच फरक पडत नाही.

तेव्हा मलाच त्यांना उत्तर द्यावे लागणार. त्या नंतर एके दिवशी शाळेत त्या मैत्रिणींनी तिची कंपास लपवली.काय करावे तिला कळेना शिक्षकांना सांगून काही उपयोग नव्हता कारण मुली कोणाचे एकत नव्हते. यावेळी रीया रडली नाही तिने सगळ्यांना उत्तर दिले. मग त्या मुलींनी तिची कंपास परत केली, आणि ती आनंदी झाली की तिने उत्तर दिले त्यामुळे तिचा मार्ग तिला सापडला.



-आलिया खाटिक
इयत्ता 4थी

## आरवचा लाडू

एक मुलगा होता. त्याचे नाव आरव होते. तो खूप आळशी होता. आरवला लाडू खूप आवडतात.त्याची आई त्याला चांगले धडे देते, पण त्याने आईचे ऐकले नाही. एके दिवशी आरवची आई झोपली, तो किचनमध्ये गेला आणि लाडुचा डबा काढू लागला पण तो पडला.आणि सगळे लाडू खाली पडून खराब झाले.त्या पडण्याचा आवाज झाला,तेव्हा आरवची आई उठली आणि त्याला खूप ओरडली. तेव्हा त्याला त्याची चूक कळली की,मी आईला मागितले असते तर बर झाले असते.त्यामुळे लाडू खराब झाले नसते व मला खायलाही मिळाले असते.



-आलिया खाटिक
इयत्ता 4थी

## होळी

होळीचा दिवस होता, सगळी मुल होळी खेळत होती. सोनू ,मोनू रिंकी ,चिंकी असे चार मित्र खूप चांगले होते. चौघेही एकत्र होळी खेळत होते. एकमेकांना गुलाल लावत होते. चौघेही खूप मस्ती करत होते आणि त्याच्या घरी खूप मिठाई तयार करण्यात आली होती. ती मुलं त्याच्या आजीच्या गावी आले होते. त्यांनी अशी होळी यापूर्वी कधीच साजरी केली नव्हती. सगळे आनंदात होते अचानक कोणी तरी ओरडण्याचा आवाज आला पाहिले तर काय एका मुलीच्या अंगावर आगीतील कागद उडून तिच्या कपड्यावर पडल्याने ती पेटली होती कोणालाही काय करावे काही समजेना. सगळा गोंधळ सुरू झाला तेव्हा ह्या चार मुलांनी मिळून ती आग विजवली व त्या मुलीचा जीव वाचवला. त्यामुळे सर्वांनी त्यांचे कौतुक केले. त्या दिवसापासून त्यांची मैत्री अजून पक्की झाली.



-गीतांजली
इयत्ता -6 वी

## हावरट ससा

एका जंगलात एक ससा रहात होता. तो खूप हवरट होता. एके दिवशी ससा आणि ससाचे मित्र गाजराच्या शेतात गेले. त्यांनी खूप गाजरे खाल्ले तेवढ्यात शेताचा मालक आला. त्याच्या हातात काठी होती. ससाचे सगळे मित्र पळायला लागले पण ससा काही उठेना. त्याचे मित्र म्हणाले चल लवकर चल. ससा म्हणाला " थांब मला अजुन  गाजरे खायचे आहे. तेवढ्यात शेताचा मालक जवळ आला. शेताच्या मालकाने ससावर काठी जोरात मारली तरी पण तो धावत सुटला. त्याला खूप दुखत होते.तेव्हा त्याच्या मित्रांनी समाजावले की,हवरटपणा करायचा नसतो . सश्याला हे पटले त्यानंतर त्याने कधीही हावरटपणा केला नाही.



-आराध्या भांडवलकर
इयत्ता -4 थी

## उपकाराची फेड

एकदा एका सिंहाच्या पायात भला मोठा काटा घुसला.
आपल्या दातांनी तो काढण्याचा प्रयत्न सिंहाने केला. बराच प्रयत्न केला पण तो काटा निघाला नाही. लंगडत लंगडत तो एका मेंढपाळाकडे गेला .सिंह  आपल्याजवळ येत आहे, हे पाहून तो मेंढपाळ खूप घाबरला. परंतु त्याला ठाऊक होते की , तो जर पळून जायचा प्रयत्न करेल तर सिंह त्याला एका पांजातच पकडेल. झाडावर चढून बसावे तर जवळपास झाडही नव्हते. आता दुसरा कोणताच उपाय नाही हे पाहून तो मेंढपाळ चुपचाप तेथेच बसून राहिला. सिंहाने गर्जना केली नाही की तो गुरगुरला नाही. हे पाहून मेंढपाळाला आश्चर्य वाटले. सिंह मेंढपाळाला म्हणाला माझ्या पायात काटा घुसला तो तू काढून दे मी तुला काहीही करणार नाही.उलट तुला जेव्हा कोणी त्रास देईल तेव्हा मी तुला वाचवेल. मेंढपाळाने सिंहाच्या पायातला काटा काढला. सिंह निघून गेला. काही दिवसानंतर मेंढपाळ आपल्या मेंढ्या घेऊन जंगलात गेला तर बाकीचे प्राणी त्याला व मेंढ्याना त्रास देत होते तेव्हा सिहाने त्या प्राण्यापासून मेंढपाळाची व मेंढ्यांची सुटका केली व आपल्या उपकाराची परतफेड केली.



-पृथ्वीराज जाधव
इयत्ता - 4 थी

## जिवलग मित्र

एक गाव होते, तिथे दोन मित्र रहायचे. त्यांचे नाव होते सखाराम आणि समर . सखाराम गरीब स्वभावाचा होता. त्याला एक मुलगा होता. त्याचे नाव अर्जुन होते. एकदा सगळेजण दुसऱ्या गावातून काम करून येत होते. तेव्हा त्यांना एक साधु बेशुद्ध पडलेला दिसला .तेव्हा त्यांनी त्या साधूला मदत केली.त्याला उठवले पाणी पाजले. साधूला ब्रे वाटले ते म्हणाले की ,तुम्ही माझी खूप मदत केली .नाहीतर मी इथेच पडून राहिलो असतो .मला तुम्हाला काही तरी द्यायचे आहे पण माझ्याकडे तुम्हाला द्या काहीही नाही .सगळे म्हणाले की,आम्हाला काहीं नको.तुम्हाला बरे वाटले ना बस झाले.पण साधू काही ऐकेना तो म्हणाला माझ्याकडे धन दौलत नाही पण एक विशेष प्रकारची माती आहे.ती मी तुम्हाला देतो.त्या मातीने तुम्ही काहीही बनवले तरी ते तुटणार नाही.साधूच्या आग्रहामुळे त्यांनी ती माती घेतली.आणि घरी आले. समरने त्या माती पासून मडके बनवले.सखाराम त्याच्या मुलाला म्हणाला की आपण पण मडके बनवू. अर्जुन म्हणाला नको बाबा aapn मडके नको खेळणी बनवू .सखाराम म्हणाला अरे खेळणी जातील का? मडके म्हणजे सगळे घेतील पण अर्जुन म्हणाला हो जातील.मडके बनवले तर लोक एकदाच घेतील पण जर खेळणी वेगवेगळी बनवली तर लोक नेहमी घेतील.आणि तसेच झाले सखारामने बनवलेली खेळणी सर्वांना आवडू लागली .लोक ते जास्त खरेदी करू लागले.मात्र समरने बनवलेले मडके लोक नंतर विकले जात नव्हते. तेव्हा समरच्या लक्षात आले की,कोणतेही काम करण्यापूर्वी पुढचा विचार नीट करण्याची गरज आहे.तेव्हा त्याने ही अर्जुन आणि सखाराम बरोबर चर्चा करून त्या मडक्यावर वेगवेगळी चित्र काढली त्यामुळे त्याची मडकी ही लोक घेऊ लागले.





-अर्णव कर्डिले

इयत्ता - 6वी

## ओरडणारे गाढव

एक व्यापारी होते. त्याला गाढव खूप आवड होते. त्याला एक गाढव खरेदी करायचा होता. त्यानंतर तो गेला गाढव विकत घ्यायला. तिथे खूप वेगवगळ्या प्रकारचे गाढव होते. त्याच्यातून एक गाढव त्याला खूप आवडते. तो ते गाढव घेऊन घरी जातो. त्याला गाढव विकत घेतल्याचा आनंद होतो पण त्या गाढवाला एक वाईट सवय असते. ती म्हणजे रात्र झाली की, तो जोराने ओरडायचा त्यामुळे सगळे वैतागायचे त्या व्यापाऱ्याला मात्र गाढव खरेदी करताना ही गोष्ट माहीत नव्हती. आता काय करावे हे त्याला कळेना. खूप प्रयत्न करुनही गाढव काही बदलले नाही. व्यापाऱ्याला काय करावे ते समजेना . त्याने एक युक्ती केली ती म्हणजे रात्र होताच तो व्यापाऱ्याला घेऊन बाहेर फिरायचा त्यामुळे ते हळूहळू ओरडायचे बंद झाले. त्याला खूप आनंद झाला.





-श्रुती सिंग

इयत्ता - 4 थी